महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने ऑक्टोबर २००८ मध्ये सादर केलेल्या जल दर विषयक दृष्टीनिबंधावरील निवेदन

**महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाला**
**पाण्याच्या ठोक (घाऊक) दराबाबत**
**विविध संस्था-संघटनांनी सादर केलेले**

# संयुक्त निवेदन

# अनुक्रमणिका


**ओळख** १

१. संक्षिप्त निवेदन २

२. सविस्तर निवेदन ५

**परिशिष्ट १ :** सहभागी संस्था-संघटनांची व तज्ज्ञांची नावे १९


---

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाला वरील निवेदन सादर करणाऱ्या विविध संस्था-संघटनांचे शिष्टमंडळ पुढीलप्रमाणे होते:
१) प्रा. एन. डी. पाटील, महाराष्ट्र राज्य इरिगेशन फेडरेशन, कोल्हापूर व शेतकरी कामगार पक्ष; २) भारत पाटणकर, श्रमिक मुक्ती दल; ३) भरत कावळे, समाज परिवर्तन केंद्र, नासिक; ४) सुरेखा दळवी, श्रमिक क्रांती संघटना, पेण, रायगड; ५) उल्का महाजन, सर्वहारा जनआंदोलन, माणगांव, रायगड; ६) अजित अभ्यंकर, किसान सभा, सी.पी.आय. (एम); ७) सुहास कोल्हेकर, जनआंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय; ८) प्रकाश रेड्डी, सी.पी.आय.; ९) भालचंद्र केरकर, कष्टकरी शेतकरी संघ, श्रीरामपूर; १०) दत्ता देसाई, समाज विज्ञान अकादमी, पुणे; ११) सुहास परांजपे/ के. जे. जॉय/ सीमा कुलकर्णी/ श्रीपाद लेले, सोपेकॉम संस्था, पुणे; १२) श्रीनिवास सहस्त्रबुध्दे, सिंचन क्षेत्रातील तज्ज्ञ, पुणे; १३) सीताराम शेलार, युवा संस्था, मुंबई; १४) संपत काळे, राष्ट्रीय जनवकालत अध्ययन केंद्र, पुणे; १५) सुबोध वागळे/ सचिन वारघडे/ जितेश परदेशी / कल्पना दीक्षित, प्रयास संस्था, पुणे व इतर नागरी संघटना

---

संयुक्त निवेदन सादर करण्याच्या प्रक्रियेत सहभागी झालेल्या इतर संस्था-संघटनांची व तज्ज्ञांची नावे परिशिष्टात दिली आहेत.

# ओळख

जलक्षेत्राचे नियमन करण्यासाठी 'स्वायत्त जलसंपत्ती नियमन प्राधिकरण' (इन्डिपेंडन्ट वॉटर रिसोर्सेस रेग्युलेटरी ॲथॉरिटी) स्थापन करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. सन २००५ साली महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (म.ज.नि.प्रा.) कायदा पारित झाला व सदर प्राधिकरणाची स्थापना झाली. या कायद्याच्या तरतुदींनुसार सन २००८ मध्ये म.ज.नि.प्रा.ने राज्यातील ठोक (घाऊक) पाण्याचे दर ठरविण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. लोकसहभागी प्रक्रिया अंतरभूत असलेले म.ज.नि.प्रा. चे हे पहिलेच पाऊल आहे. ज्याप्रमाणे वीज नियामक आयोगामार्फत वीजेच्या दराची निश्चिती व नियमन केले जाते त्याचप्रमाणे जलक्षेत्रात ठोक जल दर निश्चिती व नियमनाचे कार्य म.ज.नि.प्रा. व्दारे केले जाणार आहे. लोकांच्या दृष्टीने पाण्याचे महत्त्व लक्षात घेता या प्रक्रियेचे महाराष्ट्रावर दूरगामी आणि व्यापक परिणाम होतील, असे दिसते. तसेच, भारतातील इतर राज्यांच्या दृष्टीनेही ही प्रक्रिया एक उदाहरण म्हणून महत्त्वाची ठरणार आहे.

जल दर ठरवण्याच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून म.ज.नि.प्रा. ने ऑक्टोबर २००८ मध्ये ठोक जल दर विषयक दृष्टीनिबंध (ॲप्रोच पेपर) सादर केला. या दृष्टीनिबंधावर लोकांशी सल्लामसलतीची प्रक्रियाही सुरू केली. महाराष्ट्रातील विविध संस्था-संघटना व तज्ज्ञ व्यक्तींनी दि. १९ जानेवारी २००९ रोजी पुण्यामध्ये एकत्र येऊन याविषयी चर्चा केली. सदर दृष्टीनिबंध व त्याबाबतची म.ज.नि.प्रा. ने सुरू केलेली प्रक्रिया सदोष असल्याचे या चर्चे दरम्यान निष्पन्न झाले. त्यामुळे म.ज.नि.प्रा. ला याविषयी विविध मागण्यांचे संयुक्त निवेदन सादर करण्याचा निर्णय चर्चेतील सहभागी संस्था-संघटनांनी घेतला. त्यानुसार दि. २० जानेवारी रोजी एक संक्षिप्त निवेदन म.ज.नि.प्रा. ला तातडीने पाठविण्यात आले. त्याचबरोबर या संस्था-संघटनांनी दि. २८ जानेवारी रोजी म.ज.नि.प्रा. च्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची मुंबई कार्यालयात प्रत्यक्ष भेट घेतली. या भेटी दरम्यान संस्था-संघटनांच्या शिष्टमंडळाने म.ज.नि.प्रा. ला मागण्यांचे सविस्तर निवेदन सादर केले.

राज्यातील विविध संस्था-संघटनांनी सादर केलेल्या या निवेदनांचा वापर व्यापक स्तरावरील जनजागृतीसाठी करता यावा म्हणून सदर निवेदने पुस्तिकेच्या स्वरूपात संकलित करत आहोत. या पुस्तिकेच्या आधारे जल दरांबाबत स्थानिक स्तरावर विचारविनिमय सुरू व्हावा व त्याआधारे योग्य ते कृती कार्यक्रम हाती घेतले जावेत ही या मागील अपेक्षा आहे.



# १.

# संक्षिप्त निवेदन

**दि.१९ जानेवारी २००९ ला पार पडलेल्या बैठकीनंतर विविध संस्था संघटनांनी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाला पाठविलेले संयुक्त निवेदन**

प्रति, तारीख : १९ जानेवारी २००९

अध्यक्ष,
महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण,
जागतिक व्यापार केंद्र, ९ वा मजला,
कफ परेड,
मुंबई ४००००५

**विषय: ठोक जल दर प्रणाली वरील दृष्टीनिबंध व सल्लामसलतीची प्रक्रिया**

महोदय,

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने ठोक जल दर तयार करण्याची जी प्रक्रिया सुरू केली आहे. या प्रक्रियेचे महाराष्ट्रावर फार दूरगामी आणि व्यापक परिणाम होणार असल्याने ही प्रक्रिया गांभीर्याने आणि निर्दोषपणे घडवण्याची गरज आहे. या दृष्टीने नियमन प्राधिकरणाने प्रकाशित केलेला दृष्टीनिबंध अतिशय सदोष तर आहेच शिवाय चुकीच्या पध्दतीने तयार केलेला आहे. त्या आधारे पुढील प्रक्रिया घडवणे हानिकारक ठरणार आहे. म्हणून तो संपूर्णपणे फेटाळण्यात यावा, अशी आमची मागणी आहे. त्याची ठळक कारणे खालीलप्रमाणे:

**१)** कार्यकक्षात्मक अटींनुसार (टर्म्स ऑफ रेफरन्स) ठरवलेल्या अत्यल्प मुद्द्यांची दृष्टीनिबंधात नाममात्र पूर्तता झालेली असली तरी, कार्यकक्षा अटींमधील बहुसंख्य गोष्टींकडे मात्र पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले आहे. (यासंबंधी सविस्तर विश्लेषण प्रयास आणि सोपेकॉम तसेच इतर संस्थांनी दिलेल्या अभिप्रायामध्ये केलेले आहे.) त्यामुळे सदर दृष्टीनिबंध हा कार्यकक्षेला मुळातच धरून नाही, हे आपण लक्षात घ्यावे.

**२)** दृष्टीनिबंधात ठोक जल दर निर्धारणासाठी वापरलेली पध्दती (मेथडॉलॉजी) एकतर मोघम आहे, आणि अनेक महत्त्वाच्या गोष्टींचा आधारदेखील स्पष्ट करण्यात आलेला नाही.

**३)** दृष्टीनिबंधामधील ठोक जल दर निर्धारणाच्या मांडणीतील प्रत्येक टप्पा सदोष आहे हे विविध संस्था/संघटनांनी केलेल्या विश्लेषणामधून स्पष्ट दिसून येते. (कृपया सोपेकॉम, प्रयास, श्रमिक मुक्ती दल, श्री. सहस्रबुध्दे व इतरांनी दिलेले तपशीलवार अभिप्राय पाहावेत.)

**४)** हा दृष्टीनिबंध म्हणजे, वास्तव परिस्थितीचे विश्लेषण करून काढलेले निष्कर्ष नसून, तो एक पूर्वनिश्चित निष्कर्षांपर्यंत पोचण्याचा प्रकार आहे.

**५)** जल क्षेत्राच्या दृष्टीने महत्त्वाच्या अशा अनेक गोष्टींचा संदर्भही सदर दृष्टीनिबंध तयार करताना घेण्यात आलेला नाही. उदाहरणार्थ, सल्लागाराने आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनुभव मांडलेला आहे, मात्र त्या अनुभवाचे झालेले चिकित्सक विश्लेषण व इतर आंतरराष्ट्रीय अनुभव लक्षात घेतलेले नाहीत. तसेच या अनुभवाचा महाराष्ट्राची परिस्थिती लक्षात घेता कसा उपयोग करता येईल हे मांडलेले नाही. त्याचबरोबर महाराष्ट्रामधील समन्यायी पाणी वाटपाची चळवळ आणि इतर नाविन्यपूर्ण प्रयोगांमधून पुढे आलेली महत्त्वाची तत्त्वे यांच्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करण्यात आले आहे.

**६)** ठोक जल दराचा विचार करताना केवळ तीन प्रवर्गांचा (घरगुती, शेती आणि उद्योग) विचार केला आहे. त्याशिवाय पाण्याचे जे इतर वापर आहेत (उदाहरणार्थ, जलविद्युत, मासेमारी, मनोरंजन) त्यांचा जल दरामध्ये काय वाटा असणार हे स्पष्ट केलेले नाही.

**७)** समन्यायाच्या तत्त्वानुसार पाणीवापरापैकी ठराविक भाग 'उपजीविकेच्या आणि इतर मूलभूत गरजा भागवण्यासाठी आवश्यक असणारा मूलभूत हक्क' म्हणून मान्य करून त्यासाठी अल्प जल दर ठेवणे आणि खात्रीशीर पाणीपुरवठा करणे आवश्यक आहे. या तत्त्वाची दृष्टीनिबंधामध्ये दखलही घेण्यात आलेली नाही.

दृष्टीनिबंधातील या सर्व मूलभूत त्रुटी लक्षात घेता आणि आधी म्हटल्याप्रमाणे या प्रक्रियेचे दूरगामी आणि व्यापक परिणाम लक्षात घेता आम्ही खालील गोष्टी सुचवित आहोत:

१) सदर दृष्टीनिबंध पूर्णपणे नामंजूर करून ठोक जल दर निर्धारणाची प्रक्रिया नव्याने सुरू करावी.

२) आधी जाहीर केलेली, चार ठिकाणी होणार असणारी सल्लामसलतीची प्रक्रिया नवीन दृष्टीनिबंध तयार होईपर्यंत स्थगित करावी.



३) नवीन प्रक्रियेची दोन टप्प्यात विभागणी करावी:

अ) पहिल्या टप्प्यात कामकाज प्रचालन विनियम (सीबीआर) आणि जल दराची मार्गदर्शक व व्यावहारिक तत्त्वे तयार करावीत. या टप्प्यातील कामकाज पूर्णपणे सहभागी पध्दतीने व्हावे. या टप्प्यातील कामावर सुनियोजित व सघन सल्लामसलतीची प्रक्रिया घडवून त्यावर सर्वसाधारण सहमती तयार झाल्यानंतरच दुसऱ्या टप्प्याची सुरूवात करण्यात यावी.

ब) दुसऱ्या टप्प्यात प्रत्यक्ष ठोक जल दर निर्धारण करण्यासाठी कोणती पध्दत वापरावी आणि जल दराच्या अटी आणि शर्ती यांचे सविस्तर विवेचन असावे.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने या विषयावर संबंधित संस्था/संघ़टना व्यक्ती यांच्याबरोबर ताबडतोबीने एका बैठकीचे आयोजन करावे, अशी मागणी आम्ही करत आहोत.

आपले,

नाव संस्था सही

•••

# २.

# सविस्तर निवेदन

## दि. २८ जानेवारी २००९ ला विविध संस्था-संघटनांच्या शिष्टमंडळाने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या कार्यालयात बैठक आयोजित करून त्यांना सादर केलेले सविस्तर निवेदन

**ओळख**

दि. १९ जानेवारी २००९ ला पुण्यामध्ये राज्यातील विविध नागरी गटांची बैठक पार पडली. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने (म.ज.नि.प्रा) प्रकाशित केलेले 'ठोक जलदर निश्चितीचे विनियम' या विषयावरील दृष्टीनिबंधावर सदर बैठकीत जमलेल्या एकूण ६० सहभागींनी सखोल चर्चा केली. राज्यातील विविध भागातून आलेले अभ्यासक, संस्था-संघटनेचे कार्यकर्ते व पाणी वापर संस्थांच्या पदाधिकारींनी सदर बैठकीत संयुक्त ठराव करून जल नियमन प्राधिकरणाला दि.१९ जानेवारी २००९ रोजी एक संक्षिप्त स्वरुपाचे निवेदन पाठविण्यात आले.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने ठोक जल दर तयार करण्याची जी प्रक्रिया सुरू केली आहे या प्रक्रियेचे महाराष्ट्रावर फार दूरगामी आणि व्यापक परिणाम होणार असल्याने ही प्रक्रिया गांभीर्याने आणि निर्दोषपणे घडवण्याची गरज आहे अशी भूमिका सदर निवेदनात घेण्यात आली आहे. या दृष्टीने नियमन प्राधिकरणाने प्रकाशित केलेला दृष्टीनिबंध अतिशय सदोष तर आहेच शिवाय चुकीच्या पध्दतीने तयार केलेला आहे असा चर्चेनंतर निघालेला निष्कर्ष निवेदनात मांडण्यात आला आहे. त्या आधारे पुढील प्रक्रिया घडवणे हानिकारक ठरणार आहे. म्हणून तो संपूर्णपणे फेटाळण्यात यावा, अशी मागणी सदर निवेदनात करण्यात आली.

सदर संक्षिप्त निवेदनातील मुद्दे सविस्तरपणे मांडण्याचा प्रयत्न येथे केला आहे. राज्यातील विविध नागरी गटांच्या ठोक जलदर निश्चितीच्या प्रक्रियेबाबत व आशयाबाबतच्या मागण्यांची योग्य ती कारणमीमांसा या 'सविस्तर निवेदनात' करण्यात आली आहे. या निवेदनातील मुद्दे प्रामुख्याने पुढील तीन भागांमध्ये विभागलेले आहेत:

१) ठोक जलदर नियमनाविषयी दृष्टीनिबंधातील आशयास आम्ही विरोध का करत आहोत?

२) जल नियमन प्राधिकरणामार्फत ठोक जलदराविषयी विनियम निश्चितीच्या सुरु असलेल्या प्रक्रियेस आम्ही विरोध का करत आहोत?

३) ठोक जलदर विनियम निश्चितीच्या प्रक्रियेबाबत आमच्या मागण्या काय आहेत?



## १. दृष्टीनिबंधातील आशयास विरोध असण्याची कारणे

### १.१ ठोक जलदराच्या प्रस्तावातील मूलभूत उणीवा: महसूलामध्ये वसूलीचा वाटा ठरविण्यासाठी अपूर्ण व चुकीचे निकष

कार्यचालन व परिरक्षणाचा (ऑपरेशन्स ॲण्ड मेंटेनन्स/O&M) खर्च भरुन निघावा यासाठी आवश्यक महसूलामध्ये शेती, उद्योग व घरगुती वापरकर्ते या प्रत्येक प्रवर्गाकडून करावयाच्या वसूलीचा वाटा कसा ठरवायचा? याबाबतचा दृष्टीनिबंधातील प्रस्ताव हा सर्वात कळीचा व गाभ्याचा प्रस्ताव आहे. सदर प्रस्तावात अनेक मूलभूत व गंभीर स्वरुपाच्या उणिवा आहेत. परिणामी, सदर दृष्टीनिबंध संपूर्णपणे निरुपयोगी ठरतो. यातील काही ठळक उणिवा पुढीलप्रमाणे :

**१.१.१** महसूलाच्या वसूलीचा वाटा ठरविण्यासाठी प्रत्येक प्रवर्गाचा 'एकूण पाण्याचा वापर' हा निकष समाविष्ट न केल्याने सदर पध्दत सदोष ठरते. पाण्याचा एकूण वापर हा निकष वापरायचा असला तर याबाबत मांडण्यात येणारी आकडेवारी विश्वासार्ह नाही ही एक मोठी उणिव आहे. (याबाबत खालील परिच्छेद १.३.१ पहा).

**१.१.२** निकषांची निवड करताना ('आर्थिक वापर' हा निकष वगळता) इतर सामाजिक व समन्यायी तत्त्वांवरील आधारित निकषांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. (सामाजिक व समन्यायी तत्त्वांच्या मुद्यांबाबत या निवेदनातील भाग १.२ पहावा).

**१.१.३** ÷पाण्याचा दर्जा' हा दृष्टीनिबंधातील प्रस्तावित निकष प्रत्यक्ष व्यवहारातील ठोक जल पुरवठ्याची पध्दत लक्षात घेतल्यास चुकीचा ठरतो. ठोक जलपुरवठादार सद्यस्थितीमध्ये पाण्याच्या दर्ज्याच्या आधारे पाणी पुरवठा करत नाहीत.

**१.१.४** 'घरगुती जलवापर' या प्रवर्गांतर्गत मुख्यत: महापालिका व नगरपालिकांचाही समावेश होतो. सदर प्रवर्गासाठी भारांकन देताना (व त्यायोगे त्याचा महसूल वसूलीचा वाटा ठरविताना) सदर प्रवर्गामार्फत जल पुरवठ्याचा वापर फक्त पिण्यासाठी किंवा स्वयंपाक व इतर जीवनावश्यक उपक्रमांसाठी होईल असे गृहीत आहे. मात्र प्रत्यक्षात सदर प्रवर्गांतर्गत जीवनावश्यक उपक्रमांबरोबरच व्यावसायिक, मनोरंजन व इतर कारणांसाठीही पाण्याचा वापर केला जातो. ही वस्तुस्थिती लक्षात न घेता घरगुती जलवापराच्या प्रवर्गाला जे भारांकन दृष्टीनिबंधाच्या प्रस्तावात दिले आहे ते पूर्णपणे चुकीचे आहे.

**१.१.५** जलवापराच्या प्रवर्गांचा विचार करताना जलविद्युत-निर्मिती, मच्छीमारी, मनोरंजन यासारख्या इतर व्यावसायिक व महत्त्वाच्या प्रवर्गांच्या महसूलीच्या वाटपामध्ये विचार झालेला नाही.

**१.१.६** शेतीसाठी 'आर्थिक वापर' या निकषासाठी २.५ भारांकन दिले आहे तर उद्योगासाठी ५ भारांकन दिले आहे. मात्र, उद्योग आणि शेती क्षेत्राच्या उत्पादनाच्या

बाजारातील मूल्यामध्ये पाण्याच्या उपलब्धतेमुळे होणाऱ्या वृध्दीचे तुलनात्मक प्रमाण लक्षात घेता हे भारांकन शेती क्षेत्रावर अन्याय करणारे आहे. हे भारांकन कोणत्या आधारावर दिले आहे, हे दृष्टीनिबंधात स्पष्ट केलेले नाही.

**१.१.७** शेतीसाठी 'जलपुरवठ्याची विश्वासार्हता' (रिलायबिलिटी) या निकषासाठी २.५ भारांकन दिले आहे तर उद्योगासाठी ३ भारांकन दिले आहे. प्रत्यक्षात पाणीपुरवठा करताना शेतीक्षेत्राला दुय्यम स्थान दिले जाते. त्यामुळे उद्योग क्षेत्राच्या जवळपास जाईल इतके भारांकन शेती क्षेत्राला देणे वस्तुस्थितीला धरून नाही. हे भारांकन कोणत्या आधारावर दिले आहे, हे दृष्टीनिबंधात स्पष्ट केलेले नाही.

**१.१.८** भारांकन देताना १ ते ५ ही फूटपट्टी वापरली आहे. सदर भारांकनासाठी वापरावयाचे निकष व त्यांची व्याप्ती बघता १ ते ५ ही फूटपट्टी उपयूक्त नाही. सदर फूटपट्टी वापरण्यामागील कारणे वा निकष दृष्टीनिबंधात दिलेले नाहीत. त्यामुळे प्रस्तावित पध्दत शास्त्रीय आधारावर निकामी ठरते. सदर फूटपट्टी १ ते १० किंवा १ ते १०० का नाही त्याचे कोठेही स्पष्टीकरण नाही.

## १.२ "समन्यायी" तत्त्वाचा योग्य अंतर्भाव करण्यात संपूर्ण अपयश

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, २००५ या अधिनियमामध्ये "समन्यायी" व "शाश्वत" व्यवस्थापन या तत्त्वांना फक्त महत्त्वच नाही तर कायदेशीर मान्यताही देण्यात आली आहे. त्यामुळे सदर तत्त्वांचा परिपूर्ण व योग्य अंतर्भाव ठोक जलदर विनियम व निश्चितीमध्ये करणे अनिवार्य आहे. मात्र दृष्टीनिबंधामध्ये सदर तत्त्वांचे परिपूर्ण आकलन नसल्यामुळे सल्लागाराने या तत्त्वांकडे पूर्ण दुर्लक्ष केले गेले आहे. त्यामुळे ते कायद्यातील विधीमान्य तत्त्वांविरोधी ठरेल. सदर तत्त्वांचा अंतर्भाव करण्यात सल्लागाराची फक्त असमर्थतताच नाही तर अनिच्छाही दिसते. यामुळे सदर दृष्टीनिबंध पूर्णपणे सदोष ठरतो व सल्लामसलतीसाठी सुध्दा अपूर्ण ठरतो.

"समन्यायी" तत्त्वाचा योग्य अंतर्भाव करण्याबाबतच्या दृष्टीनिबंधातील उणीवा पुढील प्रमाणे:

**१.२.१** ÷जलदर भरण्याची क्षमता' (ability to pay) या तत्त्वाचे विवेचन करताना सल्लागाराने सदर तत्त्व प्रत्यक्षात राबविणे कठीण असल्याने ते ठोक जल दर निश्चितीचे प्राथमिक तत्त्व म्हणून वापरात आणू नये असा युक्तीवाद केला आहे. त्यामुळे 'खर्च–वसूली' या तत्त्वाला प्रथम स्थान आणि 'जलदर भरण्याची क्षमता' या तत्त्वाला (फक्त महसूल वाटपाच्या टप्प्यावर) दुय्यम स्थान दिले आहे. वास्तविक शेती व शेतकऱ्यांची खालावलेली आर्थिक–सामाजिक स्थिती, तसेच राज्यातील इतर गरीब–वंचित समाजाचा



विचार केल्यास 'जल दर भरण्याची क्षमता' या तत्त्वास ठोक जल दर निश्चितीमध्ये सर्वात महत्त्वाचे व प्राथमिक स्थान मिळणे गरजेचे आहे. 'जल दर भरण्याची क्षमता' हे काही फक्त घटत्या वैयक्तिक उत्पन्नाशी संबंधित नाही तर त्याचा संबंध पाणी वापराशी निगडीत इतर अनेक पैलूंशी आहे. सदर तत्त्वांचा संबंध फक्त वैयक्तिक उत्पन्नाशी जोडणे हे विविध सामाजिक घटकांबाबतची दृष्टीनिबंधाची समज उथळ असल्याचे दर्शवते. या संदर्भात,उत्पादन क्षेत्रातील प्रगतीचा व भविष्यातील शेती–प्रगतीच्या क्षमतांचा देखील विचार करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, शेतकऱ्यांची 'जलदर भरण्याची क्षमता' ही शेती क्षेत्रातील एकंदर परिस्थिती पाहून ठरविणे आवश्यक आहे. या गोष्टी शेती मालाच्या बाजारभावाशी व अन्न–सुरक्षितता या मूलभूत गरजेशीही जोडलेल्या आहेत. 'पूर्ण खर्च–वसूली' तत्त्व लागू करताना 'आस्थापना–खर्च' (उदा. अभियंत्यांचे पगार) व इतर खर्चात नियमित वाढ होत राहते. मात्र, त्याच नियमिततेने व त्याच प्रमाणात शेतीमालाचे भाव वाढत नाहीत किंवा ग्रामीण व शहरी गरिबांचे उत्पन्न वाढत नाही ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. त्यामुळे 'खर्च–वसुली' हे तत्त्व प्राथमिक मानता येणार नाही.

**१.२.२** ठोक जल दर हे महत्त्वाच्या धोरणात्मक उद्देशांची पूर्तता करण्याचे महत्त्वाचे साधन असू शकते. हे लक्षात घेता, ठोक जल दर हे धोरणात्मक उद्दिष्टांशी सुसंगत असणे आवश्यक आहे. सदर उद्दिष्टे गाठण्यासाठी एक साधन म्हणून ठोक जल दराचे विनियमन होणे आवश्यक आहे. धोरणात्मक उद्दिष्टे गाठण्यासाठी आर्थिक उपक्रमांना वळण देण्याचे महत्त्वाचे कार्य ठोक जल दर प्रणाली करु शकते. मात्र याचा समावेश व सखोल विवेचन दृष्टीनिबंधात पूर्णपणे दुर्लक्षित राहिले आहे. "जीवनावश्यक शेती" किंवा "शेती व शेतीसंलग्न उपक्रमांधारित शाश्वत उपजीविका" यास प्रोत्साहन व संरक्षण देण्याच्या संदर्भात ठोक जल दर प्रणाली कशी असली पाहिजे याबाबतच्या दृष्टीकोनाचा मुळातच अभाव असल्यामुळे यासाठी कोणताही प्रस्ताव दृष्टीनिबंधात नाही.

वास्तविक पहाता, राज्यघटनेने 'जगण्याचा व उपजीविकेचा हक्क' सर्वांना प्रदान केलेला असल्यामुळे किमान जगण्यासाठी आवश्यक पाण्याचा हक्क, व त्यासाठी वेगळी ठोक जल–दर प्रणाली असणे आवश्यक आहे. तसेच कृषी–हवामानाचे वैविध्य लक्षात घेऊन ठोक जल दर आकारणी करणे गरजेचे असले तरी हा विचारही दृष्टीनिबंधात पूर्णपणे धुडकावून लावला आहे. परिणामी, तीव्र व कठिण कृषी–हवामानातील शेतकऱ्यांच्या (उदा. डोंगराळ भाग, अतिवृष्टी किंवा दुष्काळी भाग) अडचणी लक्षात घेऊन त्यांच्यासाठी 'ठोक जल दराचा' समन्यायी विचार दृष्टीनिबंधात अजिबात झालेला नाही. एकंदरितच, महाराष्ट्रातील भौगोलिक, आर्थिक, व सामाजिक वैविध्याबाबत दृष्टीनिबंधात व्यक्त करण्यात

आलेली समज अत्यंत जुजबी आणि उथळ आहे व त्यामुळे त्याबाबतच्या गरजांकडे डोळेझाक केली गेली आहे.

**१.२.३** पाणी वापर संस्थांसाठी ठोक जल दर ठरवताना केवळ जमिनधारक सभासद असलेल्या पाणी वापर संस्थांचाच विचार दृष्टिनिबंधात झालेला दिसतो. परंतु भूमिहीनांसह गावातील सर्व नागरिक सभासद असलेल्या व समन्यायी तत्त्वांच्या आधारे स्थापन झालेल्या पाणी वापर संस्थांचा वेगळा विचार ठोक जल दराबाबत करणे आवश्यक आहे. शासनाच्या मान्यतेने हनुमंतवाडीये गांव (ता. कडेगांव, जि. सांगली) येथे पथदर्शी स्वरुपात अशा प्रकारच्या समन्यायी तत्त्वांवर उभी राहिलेली पाणी वापर संस्था असो, किंवा तासगांव, आटपाडी (जि. सांगली), चिकोत्रा (जि. कोल्हापूर) यासारख्या भागांमध्ये समन्यायी तत्त्वांवर होत असलेल्या पाण्याच्या वाटपाची फेरआखणी असो, अशा विविध पथदर्शी प्रकल्पांसाठी जल दरांचा वेगळा विचार होणे गरजेचे आहे. मात्र दृष्टिनिबंधात या सर्व प्रकल्पांकडे व त्यासाठी विशेष जल दर प्रणालीच्या आवश्यकतेकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले गेले आहे.

**१.२.४** ठोक जलदराचे प्रमुख तत्त्व म्हणून (दृष्टीनिबंधातील परिच्छेद ६.१.५ पहा) तसेच ठोक जल दर निश्चितीचा भविष्यातील आराखडा मांडताना (दृष्टीनिबंधातील आकृती १०.१ पहा) दृष्टीनिबंधात 'अंतर्गत–अनुदान कपात' (क्रॉस–सबसिडी कपात) हे धोरण असल्याचे भासविण्यात आले आहे. प्रत्यक्षात 'ज्यांना परवडणार नाही त्यांना अनुदान' हे तत्त्व राज्य जल नीतीमध्ये (राज्य जल नीती, परिच्छेद ४.४) मांडलेले आहे. या तत्त्वाविरूध्द धोरणात्मक जागा निर्माण करण्याचा दृष्टीनिबंधातील प्रस्ताव पूर्णपणे चुकीचा ठरतो.

**१.२.५** 'सिंचनाच्या पाण्याचा वापर केला नाही तरीही किमान दर' ही तरतूद लागू करताना 'समन्यायी' तत्त्वांच्या अंगाने दृष्टीनिबंधात अजिबात विचार झालेला नाही. एवढेच नाही तर पाणी उपलब्ध करुन देता आले नाही तरीही महसूलात सातत्य राखण्यासाठी किमान दर आकारावा अशी चुकीची शिफारस दृष्टीनिबंधात आढळते (दृष्टीनिबंधातील परिच्छेद ७.१६). (वास्तविक पाणी उपलब्ध करुन देता आले नाही तर किमान दर आकारु नये, असा निर्णय झालेला आहे). सदर शिफारस कालव्याच्या पुच्छाकडील (tail enders) शेतकऱ्यांना, तसेच जेथे पाणी उपलब्ध नाही त्या शेतकऱ्यांना अन्यायकारक ठरते. तसेच पाणी पुरवठ्याची गुणवत्ता अतिशय खालावलेली असली तरीही किमान दर भरणे हे सुध्दा अन्यायकारकच ठरते. या सर्वांचा विचार दृष्टिनिबंधात केलेला नाही.

**१.२.६** समन्यायाच्या तत्त्वानुसार पाण्याचा तुटवडा किंवा दुष्काळाच्या काळात 'ठोक जल दरांचा' वेगळा विचार करणे गरजेचे आहे. अवर्षणाची परिस्थिती दर काही वर्षांनी नेहमीच येत असते. त्यामुळे अवर्षणाचा विचार प्रासंगिक नसून त्याचा दरांबाबतच्या धोरणात



समावेश होणे गरजेचे आहे. तसा प्रस्ताव तर नाहीच पण याबाबत दृष्टीनिबंधात विचारही केलेला नाही. त्यामुळे दुष्काळी किंवा कोणत्याही इतर नैसर्गिक वा आर्थिक आपत्तीच्या काळातही, शेतकऱ्यांना सर्वसाधारण परिस्थितीप्रमाणेच जलदर भरावा लागेल. ही गोष्ट मजनिप्रा कायद्यातील 'समन्यायी' तत्त्वाच्या विरोधात जाणारी आहे.

**१.२.७** 'पाणीपट्टी भरण्यास विलंब झाल्यास दंड' या धोरणाची शिफारस करताना, पाणी वापरकर्ते व पुरवठादार या दोन्ही पक्षांच्या जबाबदारीकडे पुरेसे लक्ष दिलेले नाही. हे 'समन्याय' या तत्त्वाच्या विरोधी आहे. उदाहरणार्थ, जर पाणीपट्टी भरण्यास विलंब झाला तर दंडाची तरतूद केलेली आहे. मात्र पाणीपुरवठा योग्य नसेल, त्याची गुणवत्ता खालावली असेल तर मात्र दंडात्मक कारवाईची तरतूद नाही. या विषम हाताळणीची साधी जाणीवदेखील दृष्टीनिबंधात आढळत नाही. पाणीपट्टीच्या थकबाकी वा विलंबाबाबत जितके कठोर उपाय केले जातात तितकेच कठोर उपाय जल पुरवठा सेवेची गुणवत्ता खालावली असेल तर त्याविरुध्द करावेत ही बाब आता जगभर मान्य झाली असली तरी त्याची दखल दृष्टीनिबंधात घेतलेली नाही.

**१.२.८** 'ठोक जलदर पध्दती' व 'समन्यायी जल हक्क/हक्कदारी' यांचा अंतरसंबंध ओळखण्यात दृष्टीनिबंध असमर्थ ठरला आहे. तसेच 'ठोक जल दर' व 'किरकोळ जल दर' यांचा अंतरसंबंध ओळखण्यातही दृष्टीनिबंध असमर्थ ठरला आहे. ज्या ग्रामपंचायतींमध्ये २० लिटर प्रति माणशी प्रति दिन पाण्याचा पुरवठा होतो त्यांचा पाण्याचा दर हा ज्या महानगरपालिकांमध्ये १५०–२०० लिटर प्रति माणशी प्रति दिन पाण्याचा पुरवठा होतो त्या महानगरपालिकांच्या ठोक जल दराएवढा असावा का, याचा विचारच मुळात केलेला नाही. किंवा ज्या पाणी वापर संस्था २००० घनमीटर/हेक्टर याप्रमाणे पाणी वापरतात त्यांचा ठोक जल दर हा १०,००० घनमीटर/हेक्टर प्रमाणे पाणी वापरणाऱ्या पाणी वापर संस्थांएवढा असावा का, याचाही विचारच मुळात केलेला नाही.

**१.२.९** 'पर्यावरणासाठी जलपुरवठा' व 'ठोक जलदर' यांचा अंतरसंबंध ओळखण्यात दृष्टीनिबंध असमर्थ ठरतो. राज्य जलनीती (जल नीती परिच्छेद ४) तसेच मजनिप्रा कायद्यामध्ये [कलम २ (क)] 'पर्यावरणासाठी जलपुरवठयास' प्राधान्य देण्यात आले आहे. सदर कायद्यानुसार 'पर्यावरण' हा पाणी वापराच्या प्रवर्गाच्या यादीतील एक प्रवर्ग आहे. सदर प्रवर्गाच्या पाण्याची गरज व त्याचा 'ठोक जल दराशी' संबंध यांचा समावेश दृष्टीनिबंधात केलेला नाही. त्यामुळे प्रदूषण नियंत्रण किंवा नदी–नाल्यांमधील किमान प्रवाह (minimum flow) यासाठी ठोक जल दराचे हत्यार वापरण्याचा प्रस्ताव मांडण्यात दृष्टीनिबंध असमर्थ आहे.

**१.२.१०** दुहेरी दर पध्दतीचे (two-part tariff) विवेचन दृष्टीनिबंधात असले तरीही त्याची एकूण व्याप्ती, महत्त्व व परिणामांची सखोल चर्चा दृष्टीनिबंधात नाही. या पध्दतीचा परिणाम 'समन्यायी' तत्त्वावर कसा होतो याचाही उल्लेख नाही. दुहेरी दर पध्दतीमुळे जलदर पुरवठादाराला किमान महसूलाची खात्री मिळेल एवढाच एकतर्फी विचार दृष्टीनिबंधात आहे. शेतकरी किंवा इतर पाणी वापरकर्त्यांच्या दृष्टीने कोणताही विचार केलेला यामध्ये दिसत नाही. केवळ जल पुरवठादाराच्या हित संरक्षणाचा असा एकतर्फी विचार दृष्टीनिबंधात असणे अत्यंत चुकीचे आहे. शिवाय असे हितसंबंध जपल्यास सदर जल पुरवठादाराच्या अकार्यक्षम वृत्तीस वाव मिळेल आणि त्याचा भार पाणी वापरकर्त्यांवर पडेल याचे भान दृष्टीनिबंधात आढळत नाही. ही गोष्ट सदर दृष्टीनिबंधातील सामाजिक प्रश्नांबाबतच्या असंवेदनशीलतेशी सुसंगतच आहे.

**१.२.११** पाण्याची विविध प्रकारची गळती व चोरी व त्याचा जल दरांमार्फत पाणी वापरकर्त्यांवर पडणारा अन्यायकारक भार याबाबत दृष्टीनिबंधात कोणतेही ठोस विचार किंवा प्रस्ताव आढळत नाही. पाण्याची गळती व चोरीबाबत जल पुरवठादारांवर जबाबदारी टाकण्याकडे दृष्टीनिबंधात पूर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे. वास्तविक जल दराचे स्तर हे जल पुरवठा सेवेच्या गुणवत्तेशी निगडीत हवेत. गुणवत्ता खालावल्यास त्याचे विपरीत परिणाम जलपुरवठादारावर होतील, तर गुणवत्ता सुधारल्यास फायदाही होईल अशा प्रकारची ठोक जल दर प्रणाली हवी. जल दर हे जल सेवेच्या गुणवत्तेवर आधारित असावेत अशी धोरणात्मक तरतुद राज्य जलनीती (जलनीती परिच्छेद १०.१ नुसार) मध्ये असूनसुध्दा दृष्टीनिबंधात याकडे डोळेझाक केली आहे.

## १.३ चुकीची व वस्तुनिष्ठ नसलेली गृहीतके

संपूर्ण दृष्टीनिबंधात चुकीची व वस्तुनिष्ठ नसलेली गृहीतके वापरली आहेत. अशा गृहीतकांवर आधारलेला दृष्टीनिबंधातील प्रस्ताव हा पूर्णपणे चुकीचा ठरतो. याबाबतच्या ठळक उणीवा पुढीलप्रमाणे:

**१.३.१** विविध प्रवर्गांच्या भविष्यातील पाणी वापराच्या अंदाजास कोणताही शास्त्रीय आधार नाही. दृष्टीनिबंधात पाणी वापराची आकडेवारी विश्वासार्ह नाही, असे मान्य करुन सुध्दा ठोक जल दर निश्चितीची संपूर्ण गणिते याच आकडेवारीवर आधारलेली आहेत. त्यामुळे संपूर्ण पध्दतच अविश्वासार्ह ठरते. त्यामुळे या पध्दतीवर आधारित जलदर हे पूर्णत: चुकीचे ठरतात. अशाप्रकारे पुरेशी व खात्रीची आकडेवारी नसताना जल दर ठरविण्याची घाई मजनिप्रा ने टाळावी.



**१.३.२** भविष्यातील कार्यचालन व परिरक्षणाच्या खर्चाचा अंदाज हा पूर्णपणे मागील पाच वर्षांच्या प्रत्यक्ष खर्चाच्या आकडेवारीवरुन केला आहे. मात्र वाल्मी संस्थेच्या अभ्यासाचा उल्लेख करताना दृष्टीनिबंधात स्पष्टपणे म्हटले आहे की खर्चाची नेमकी गरज, मागणी, व प्रत्यक्ष झालेला खर्च यामध्ये प्रचंड तफावत आहे. असे असताना सुध्दा मागील खर्चाच्या आकडेवारीच्या आधारे संपूर्ण जल दर निश्चिती करणे चुकीचे ठरते.

**१.३.३** भविष्यातील कार्यचालन व परिक्षणाच्या खर्चाचा अंदाज करताना मागील पाच वर्षांच्या खर्चाच्या आकडेवारीचा जो आधार घेतला आहे ती आकडेवारी फक्त ठोक जलदर पुरवठ्यासाठी आलेल्या खर्चाचीच आहे व त्यामध्ये किरकोळ जलपुरवठ्याच्या खर्चाचा समावेश नाही असे दृष्टीनिबंधात गृहीत धरलेले दिसते. त्यामुळे सदर आकडेवारी वापरुन ठोक जल दर निश्चित केला आहे. मात्र ही गृहीतके तपासण्याची सोडाच, पण नमूद करण्याची तसदीदेखील दृष्टीनिबंधात घेतलेली नाही. वास्तविक मागील खर्चाच्या आकडेवारीत ठोक जलपुरवठा व किरकोळ जलपुरवठा या दोन्हीस आलेल्या खर्चाचा समावेश असणार कारण अनेक ठिकाणी किरकोळ जलपुरवठाही नदी–खोरे महामंडळाकडून केला जातो. असे असल्यास ठोक जल दर निश्चितीच्या दृष्टीनिबंधातील प्रस्तावाचा संपूर्ण आधारच शंकास्पद ठरतो.

**१.३.४** भविष्यातील खर्चाच्या अंदाजाच्या विविध पध्दतींची तुलना करताना वाल्मी संस्थेने शिफारस केलेली पध्दतही मांडली आहे. मात्र वाल्मी संस्थेने खर्चाच्या अंदाजात दरवर्षी १०% वाढ करावी अशी शिफारस करुन सुध्दा दृष्टीनिबंधात त्यामध्ये बदल करुन ६% वाढ गृहीत धरली आहे. अशा प्रकारे मूळ आकड्यात फेरफार करून बदललेल्या आकड्याच्या आधारे वाल्मी संस्थेने दिलेली पध्दत मांडणे, हे अयोग्य आहे.

**१.३.५** मागील खर्चाच्या आकडेवारीमधील वाढ 'कंपौंडेड ॲन्युअल ग्रोथ रेट' (सी.ए.जी.आर/CAGR) या पध्दतीने काढून सदर वाढीच्या दराप्रमाणे भविष्यातील खर्चाचा अंदाज काढला आहे. मात्र सदर पध्दती वापरताना मागील आकडेवारीतील सातत्याचा अभाव, तसेच विविध कालावधीतील आकडेवारीमधील स्वैर बदलांकडे दुर्लक्ष करुन फक्त दोन टोकाच्या वर्षांतील आकडेवारीचा वापर केला आहे. हे अयोग्य आहे.

**१.३.६** उद्योगांनी जल संवर्धनासाठी तंत्रज्ञानाचा वापर केल्यास पाणीपट्टीत सूट देण्याची कायदेशीर तरतूद मजनिप्रा कायद्यानुसार आहे, मात्र 'प्रदूषणकर्त्याने किंमत चुकवावी' हे तत्त्व अंमलात आणण्यासाठी दंडात्मक तरतूद करणे योग्य नाही,अशी चुकीची गृहीतके दृष्टीनिबंधात मांडलेली आहेत आणि त्याआधारे अस्वीकारार्ह अशा शिफारशी केल्या आहेत.

वास्तविक प्रत्येक प्रदुषण कर्त्याने प्रदुषणाची संपुर्ण जबाबदारी घेणे व अशा घटकांना प्रदुषण नियंत्रण व निवारण अनिवार्य करणे गरजेचे आहे. जेथे शक्य आहे तेथे पाण्याचा पुनर्वापर करण्यासाठीही बंधणे आणणे आवश्यक आहे. अशा प्रकारे पाणी वापरात बचत केल्यास पाण्याच्या उत्त्पादकतेत वाढ होईल व पाण्याच्या एकूण लाभक्षेत्रात वाढ होऊन महसूलात भर पडेल. असे झाल्यास जल दरातील अनावश्यक वाढीचा जनतेवरचा भार कमी करता येईल. मात्र यासाठी म.ज.नि.प्रा. कायद्यातील 'प्रदूषणकर्त्याने किंमत चुकवावी' या धोरणाबाबत कठोर भूमिका घेऊन दंडात्मक पाऊल उचलणे गरजेचे आहे.

## १.४ ठोक जल पुरवठ्यासाठीच्या खर्चात कार्यक्षमता व परिणामकारकता आणणे व त्या अनुषंगाने जल सेवा शाश्वत करण्याच्या उपायांकडे दुर्लक्ष

ठोक जल दर निश्चित करताना भविष्यातील खर्च निश्चित करणे आवश्यक आहे व त्या खर्चाची वसुली ठोक जलदरातून होणे अनिवार्य आहे असे दृष्टीनिबंधात प्रस्तावित आहे. मात्र दर निश्चित करताना खर्चाची तपासणी, खर्चामध्ये कार्यक्षमता व परिणामकारकता आणणे व त्यायोगे जल वापरकर्त्यांवरचा जल दराचा बोजा कमीत कमी ठेवणे यासाठी नेमके उपाय तर सुचवलेले नाहीतच, पण अशी लोकहिताची भूमिकाही दृष्टीनिबंधात नाही. त्यामुळे लोकहित जपण्याच्या दृष्टीने सदर दृष्टीनिबंध अपयशी ठरतो. याबाबत ठळक उणीवा पुढीलप्रमाणे:

**१.४.१** पाण्याची गळती तसेच चोरी कमी करण्याच्या दृष्टीने ठोस भूमिका व उपाय दृष्टीनिबंधात नाहीत. तसेच व्यावसायिक पाणी वापरकर्त्यांना दर आकारणी न होणे वा त्यांच्याकडून महसूल बुडवला जाणे, या बाबी रोखण्याबाबतही सदर दृष्टीनिबंधात विचार केलेला नाही.

**१.४.२** विविध कामातील अकार्यक्षम खर्च व त्याचा जल दरावर होणारा परिणाम याबाबत विवेचन किंवा ठोस प्रस्ताव दृष्टीनिबंधात नाही.

**१.४.३** आस्थापना खर्च मूळ देखभाल-दुरुस्तीच्या खर्चापेक्षा दोन ते तीनपट जास्त आहे, असे मागील आकडेवारीवरुन लक्षात येते. त्यामुळे सदर खर्चात परिणामकता आणण्याबाबत साधा उल्लेखही दृष्टीनिबंधात नाही.

**१.४.४** देखभाल-दुरुस्तीच्या खर्चाबाबत अनेक त्रुटी वाल्मी संस्थेच्या अभ्यासातून पुढे आलेल्या असल्या तरीही सदर खर्च जास्त परिणामकारक करण्याबाबत कोणतीही शिफारस व नियामक उपाय दृष्टीनिबंधात सुचवलेले नाहीत.



## १.५ दृष्टीनिबंधासाठी आखलेल्या कार्यकक्षात्मक अटींच्या (टर्म्स ऑफ रेफरन्स) तुलनेत प्रत्यक्ष सादर केलेला दृष्टीनिबंध अपूर्ण

दृष्टीनिबंधातील आशय काय व कसा असावा याबाबत कार्यकक्षात्मक अटींमध्ये सविस्तर यादी आहे. मात्र सदर अटींच्या पूर्ततेमध्ये प्रत्यक्ष सादर केलेला दृष्टीनिबंध पूर्णपणे अपयशी ठरतो. त्यामुळे सदर दृष्टीनिबंध अपूर्ण आहे व तो भागधारकांशी सल्लामसलतीसाठी उपयुक्त नाही.

सदर अटींच्या पूर्ततेचे सखोल विश्लेषण केल्यावर याबाबत पुढील चित्र समोर येते (तक्ता क्र. १ पहावा)

**तक्ता क्र. १. कार्यकक्षात्मक अटींच्या पूर्ततेचे मूल्यमापन**

| अ.नं. | पूर्ततेचे टप्पे | किती गोष्टींबाबत पूर्तता झाली? संख्या (टक्के) |
|---|---|---|
| १) | पूर्तता | ३ (१०%) |
| २) | अंशत: पूर्तता | ३ (१०%) |
| ३) | अंशत: पूर्तता परंतु उपयुक्त नाही | ५ (१७%) |
| ४) | थातूर मातूर चर्चा | ३ (१०%) |
| ५) | पूर्णत: दुर्लक्ष | १३ (४३%) |
| ६) | भविष्यात पूर्तता अशक्य (प्रक्रियेची) | ३ (१०%) |

संदर्भ : 'प्रयास' संस्थेने जल नियमन प्राधिकरणास दि.१५ जानेवारी २००९ रोजी सादर केलेल्या निवेदनामधील तक्ता १ ते ४ चा संदर्भ घेतला आहे. सदर तक्त्यातील 'पूर्ण दुर्लक्ष' झालेल्या गोष्टींमध्ये ३६.५% आशयाची अपूर्तता आहे तर ६.५% प्रक्रियेची अपूर्तता आहे.

तक्ता क्रमांक १ वरून असे दिसते की, सदर अटींमध्ये नमूद केलेल्या तब्बल ४३% गोष्टींची पूर्तता दृष्टीनिबंधात झालेली नाही, तर फक्त १०% आशयाची संपूर्ण पूर्तता झाली. निम्न-न्यायिक स्वरुप असणाऱ्या जल नियमन प्राधिकरणासाठी ही एक अतिशय गंभीर बाब आहे. अशा अपूर्ण स्थितीतील दृष्टीनिबंधावर सल्लामसलतीची (कायद्यानुसार बंधनकारक) प्रक्रिया सुरु ठेवणे त्याहूनही अधिक गंभीर बाब आहे.

## १.६ शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष, खाजगी कंपन्यांना लाभदायक निर्णय

विविध संस्था-संघटनांनी व व्यक्तींनी दृष्टीनिबंधामध्ये अनेक गंभीर त्रुटी दाखवल्या आहेत. एका बाजूला महत्त्वाच्या व कायदेशीरदृष्ट्या आवश्यक अशा बाबींकडे दुर्लक्ष झाले आहे; तर दुसऱ्या बाजूला प्रदूषण नियंत्रण व जल संवर्धनाची संयंत्रे बनवणाऱ्या कंपन्यांना

लाभ मिळणाच्या दृष्टीने दृष्टीनिबंधामध्ये पावले उचलण्यात आली आहेत (उदाहरणार्थ, जल संवर्धक तंत्रज्ञान वापरल्यास पाणीपट्टीतून 'रिबेट' देण्याचा प्रस्ताव). हे शक्य व्हावे यासाठी ओढून ताणून तर्कवाद मांडण्यात आले आहेत. हे आक्षेपार्ह आहे.

शेतकरी व इतर छोटे पाणी वापरकर्ते यांच्याकडे दुर्लक्ष करुन खाजगी कंपन्यांसारख्या समर्थ घटकांना स्वायत्त नियामक संस्थांकडून झुकते माप दिले जाईल असा आक्षेप या संस्थाविरुध्द मांडला जातो. जर संयंत्रे बनवणाऱ्या कंपन्यांना लाभदायक ठरणाऱ्या 'रिबेट'चा प्रस्ताव म.ज.नि.प्रा. ने मान्य केला तर वरील आक्षेपाला बळ मिळून त्याबाबतचे उदाहरण म्हणून मजनिप्रा चा हा निर्णय जगभराच्या अभ्यासकांकडून मांडला जाईल हे लक्षात घ्यायला हवे.

## २. ठोक जल दराविषयी विनियम निश्चितीच्या प्रक्रियेस विरोधाची कारणे

जलदर विनियम निश्चितीच्या प्रक्रियेमध्ये मूलभूत उणिवा आढळतात. सदर उणिवांमुळे ही प्रक्रिया कायद्यातील लोकसहभागी तत्त्वांची परिपूर्ण अंमलबजावणी करण्यात अपयशी ठरते. यातील ठळक उणीवा पुढीलप्रमाणे :

### २.१ कार्यकक्षात्मक अटींमधील प्रक्रियेसंबंधातील अटींची पूर्तता नाही

**२.१.१** जल दर विनियम निश्चितीच्या प्रक्रियेमध्ये भागधारकांचा (स्टेकहोल्डर्स) सहभाग कसा घेतला जावा याबाबतीत सविस्तर विवेचन व नियमावली असलेले 'कामकाज प्रचालन विनियम' (कंडक्ट ऑफ बिझनेस रेग्युलेशन – सी.बी.आर.) तयार करणे कार्यकक्षात्मक अटींनुसार अनिवार्य होते. मात्र याला फाटा देऊन सदर प्रक्रिया कोणत्याही विनियमांविना सुरु करण्यात आलेली दिसते. त्यामुळे सदर प्रक्रिया, तिचे टप्पे, व अपेक्षित परिणाम याबाबत पारदर्शकता व पूर्वनिश्चिती नाही. उदाहरणार्थ, दृष्टीनिबंधामध्ये ठोक जल दर विनियमांचा कच्चा मसुदा सामाविष्ट नसल्यामुळे सदर मसुद्यावर सघन पद्धतीची सल्लामसलत प्रक्रिया होणार की नाही याबाबत अपारदर्शकता आहे. त्यामुळे अनेक अंगांनी अपूर्ण असलेल्या दृष्टीनिबंधावर सल्लामसलतीची प्रक्रिया घडवून, त्यानंतर थेट विनियम व जल दराचे अंतिम आदेश तर जाहीर केले जाणार नाहीत ना, अशी शंका भागधारकांमध्ये आहे. असे झाल्यास कायद्यात समाविष्ट असलेल्या लोकसहभागाच्या तत्त्वास खीळ बसेल.

**२.१.२** ठोक जल दराच्या तत्त्वांबाबत स्वतंत्र सल्लामसलत प्रक्रिया कार्यकक्षात्मक अटींनुसार अपेक्षित होती. सदर अटींनुसार दृष्टीनिबंधाच्या भाग १ मध्ये ठोक जल दराची तत्त्वे समाविष्ट करुन त्याचे पुनर्विलोकन व मंजुरीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच पुढच्या भागाची मांडणी अपेक्षित होती. मात्र सदर अटींना धूडकावून लावले गेले आहे. ठोक जल



दरांच्या तत्त्वांबाबत कोणतीही स्पष्ट भूमिका न घेता व त्याबाबत सल्लामसलत न करता सरळ ठोक जल दर निश्चिती पर्यंतचा टप्पा सध्या सुरु असलेल्या सल्लामसलतीच्या प्रक्रियेत गाठला आहे.

**२.१.३** वरील मुद्यांवरुन लक्षात येते की जल नियमन प्राधिकरणाने सदर कामासाठी 'कामकाज प्रचालन विनियम' (सी.बी.आर) तर तयार केले नाहीतच पण स्वत: तयार केलेल्या कार्यकक्षात्मक अटीसुध्दा पाळल्या नाही. याचाच अर्थ विविध कायदे, नियम, व विनियमांच्या चौकटीत राहून इतरांच्या कामकाजाचे नियमन करणे ज्या नियमन प्राधिकरणाकडून अभिप्रेत आहे, ते स्वत:च्या कामकाजासाठी मात्र ठरलेल्या अटी पाळत नाही. या परिस्थितीचे ठोक जल दर विनियम निश्चिती तसेच दर निश्चितीच्या पुढील प्रक्रियेत गंभीर परिणाम होऊ शकतात. यासंदर्भात हे देखील लक्षात घेतले पाहिजे की स्वयंसेवी संस्थांनी वारंवार आठवण करुन देऊन सुध्दा मजनिप्राने स्वत:च्या कामकाजासंबंधातील विनियम (सीबीआर) तयार करण्याची टाळाटाळ केली आहे. खरे तर, स्वायत्त नियामक संस्थेने स्वत:चे कामकाज विषयक विनियम ताबडतोबीने तयार करणे अपेक्षित असते. ह्या टाळाटाळीमुळे स्वत:चे कामकाज नियमानुसार चालवण्याला मजनिप्राचा विरोध आहे असा काहीसा समज पसरला आहे. त्यामध्ये ठोक जल दर प्रक्रियेच्या संदर्भातील महत्त्वाच्या त्रुटींची आता भर पडते आहे. यामध्ये वेळीच सुधारणा झाली नाही तर जल नियमन प्राधिकरणाच्या पारदर्शकतेबाबत व उत्तरदायित्वाबाबत तीव्र शंका उपस्थित होतील, हे लक्षात घ्यायला हवे.

### २.२ लोकसहभागाच्या प्रक्रियेबाबत शेतकऱ्यांच्या गरजांकडे पूर्णपणे दुर्लक्ष

**२.२.१** कार्यकक्षात्मक अटींनुसार सल्लामसलतीसाठी सादर करण्यात आलेला संपूर्ण दृष्टीनिबंध मराठी भाषेत तयार करणे अनिवार्य होते. मात्र ही अट न पाळता जल नियमन प्राधिकरणाने इंग्रजीमधील दृष्टीनिबंधावर आधारित औपचारिक व जाहीर स्वरुपातील सल्लामसलतीची प्रक्रिया सुरु केली. दि. ३० नोव्हेंबर २००८ ही विविध भागधारकांनी आपली मते व सूचना पाठविण्याची अंतिम तारीख उलटून गेल्यावरही मराठीतील दृष्टीनिबंध तयार केला गेला नाही. इंग्रजी भाषा न समजणाऱ्या असंख्य शेतकऱ्यांना व त्यांच्या पाणी वापर संस्थांना सदर प्रक्रियेतून वंचित करण्यात आले. शेतकरी हा ठोक जलाबाबत सर्वात मोठा भागीदार असूनसुध्दा त्यांच्या गरजांकडे दुर्लक्ष करणे, हे मजनिप्रा कायद्यातील व कार्यकक्षात्मक अटींमधील लोकसहभागाच्या तत्त्वे व तरतूदींच्या विरोधी ठरते.

**२.२.२** विविध संस्था–संघटनांच्या सूचनांनंतर सदर दृष्टीनिबंधाचा फक्त गोषवारा मराठी भाषेत तयार करण्यात आला. मात्र तोपर्यंत दि. ३० नोव्हेंबर २००८ ही अंतिम मुदत टळून

गेली होती. मराठीतील गोषवारा हा दि. २९ डिसेंबर २००८ रोजी प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर उपलब्ध झाला, व त्यावर शेतकऱ्यांनी आपली मते व सूचना पाठविण्याची अंतिम तारीख दि. १५ जानेवारी २००९ देण्यात आली. अशा प्रकारे जेमतेम १५ दिवसांचा अवधी यासाठी देण्यात आला. तसेच सदर तारीख व मराठी गोषवारा फक्त संकेतस्थळावर देण्यात आला होता. त्यामुळे शेतकऱ्यांपर्यंत ही माहिती पोहचणे व त्यांनी १५ दिवसांच्या आत आपली मते व सूचना मांडणे अशक्य झाले. यावरुन लक्षात येते की, सल्लामसलतीच्या पहिल्या टप्प्यात शेतकऱ्यांच्या गरजांकडे पूर्णत: दुर्लक्ष करण्यात आले.

**२.२.३** दृष्टीनिबंधाच्या मराठी गोषवाऱ्यात असंख्य चुका आहेत. तसेच सदर गोषवाऱ्यामधून दृष्टीनिबंधाचे परिपूर्ण चित्र समोर येत नाही. त्यामुळे सदर गोषवाऱ्याच्या आधारे ठोक जल वापराच्या सर्वात मोठ्या प्रवर्गाबरोबर सल्लामसलत प्रक्रिया घडविणे निरर्थक ठरते.

**२.२.४** जल नियमन प्राधिकरणाने जाहीर केलेल्या राज्यातील चार ठिकाणच्या सल्लामसलतीच्या बैठकांच्या प्रक्रियेतही शेतकऱ्यांच्या गरजांचा विचार केला गेला नाही. सदर बैठकांचा कालावधी फक्त ३ तास असल्यामुळे या अल्प कालावधीत ठोक जल दरासारख्या कळीच्या प्रश्नांवर ३–५ जिल्ह्यांच्या शेतकऱ्यांना आपली मते मांडणे अशक्य आहे. तसेच सदर बैठकांमध्ये आपली मते लिखीत स्वरुपात अभिलिखीत करण्याची अट ही शेतकऱ्यांच्या दृष्टीने जाचक आहे. याचबरोबर सदर दृष्टीनिबंधातील कळीचे मुद्दे स्थानिक शेतकऱ्यांपर्यंत व त्यांच्या पाणी वापर गटांपर्यंत पोहचावेत या हेतूने, तालुका पातळीवर शक्य नसले तरी किमान जिल्हा स्तरावर कार्यशाळा किंवा जनजागृतीचे इतर पर्याय यांचा विचार झालेला नाही. त्यामुळे ही संपूर्ण प्रक्रिया लाखो शेतकऱ्यांना नजरेआड ठेवून पार पाडली जाणार असे दिसते.

## ३. ठोक जलदर विनियम निश्चितीच्या प्रक्रियेबाबत नागरी गटांच्या मागण्या

वरील विवेचनावरुन स्पष्ट होते की, जल नियमन प्राधिकरणाने सल्लामसलतीसाठी सादर केलेल्या दृष्टीनिबंधाच्या आधारे पुढील प्रक्रिया सुरु ठेवणे हे पूर्णत: चुकीचे ठरेल. याबाबत नागरी गटांच्या मागण्या पुढीलप्रमाणे:

**३.१** जल नियमन प्राधिकरणाने आपली नियोजित सल्लामसलतीच्या बैठकांची प्रक्रिया तात्पुरती पुढे ढकलावी.

**३.२** सल्लागाराने सदर दृष्टीनिबंधामध्ये विविध संस्था–संघटनांनी घेतलेल्या उणीवांचा/ आक्षेपांचा विचार करुन बदल करावेत व दृष्टीनिबंध जल नियमन प्राधिकरणाला नव्याने सादर करावा. हे करत असताना कार्यकक्षात्मक अटींची पूर्तता करणे अनिवार्य असावे. याबाबतचे योग्य आदेश जल नियमन प्राधिकरणाने सल्लागाराला द्यावेत.



**३.३** नव्याने सादर केलेला दृष्टीनिबंध परिपूर्ण आहे की नाही याची तपासणी जल नियमन प्राधिकरणाने विविध नागरी गटांशी सल्लामसलत करुन करावी. त्यानंतरच सदर दृष्टीनिबंध जाहीरपणे सल्लामसलतीसाठी प्रकाशित करावा. सदर दृष्टीनिबंधाच्या लोकाभिमुख आशयाच्या पूर्ततेसाठी नागरी गटांची देखरेख समिती गठीत करावी.

**३.४** सल्लामसलतीची प्रक्रिया ही कार्यकक्षात्मक अटींनुसार करावी. उदाहरणार्थ, दृष्टीनिबंधाचा भाग १, कामकाज प्रचालन विनियम व त्यानंतर दृष्टीनिबंधाचा भाग २ अशी टप्प्याटप्प्याने सल्लामसलतीची प्रक्रिया करावी.

**३.५** सल्लामसलतीसाठी सादर केलेला कोणताही दस्तावेज हा एकाच वेळी इंग्रजी तसेच मराठीमध्ये प्रकाशित करावा. तसेच सदर दस्तावेज व त्याचा संक्षिप्त गोषवारा प्रत्येक तालुक्याच्या सिंचन विभागाच्या कार्यालयात उपलब्ध करुन द्यावा.

**३.६** सर्व तालुकास्तरीय सिंचन अधिकाऱ्यांनी आपल्या तालुक्यातील विविध पाणी वापरकर्ते व पाणी वापर संस्थांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित कराव्यात. यासाठी जल नियमन प्राधिकरणाने त्यांना योग्य ते आदेश द्यावेत.

**३.७** सल्लामसलतीसाठी पत्र किंवा ईमेलद्वारे आपली मते व सूचना मागितल्यानंतर राज्यातील विविध भागांमध्ये सल्लामसलतीची पूर्ण दिवसाची जन–सुनावणी आयोजित करण्यात यावी. यामध्ये अर्धशिक्षित किंवा अशिक्षित भागधारकांनी तोंडी मांडलेल्या मतांची लिखित नोंद घेण्याची सोय असावी.

**३.८** सल्लामसलतीच्या संपूर्ण प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी नागरी गटांची समिती गठीत करावी.

नाव संस्था सही

•••

# परिशिष्ट १

## सहभागी संस्था-संघटनांची व तज्ज्ञांची नावे

१) प्रा. एन.डी. पाटील, महाराष्ट्र राज्य इरिगेशन फेडरेशन, ए-१, रूईकर कॉलनी, कोल्हापूर ४१६ ००३, ९८२२०५५४१०
२) डॉ. भारत पाटणकर, श्रमिक मुक्ती दल, मु.पो. कासेगाव, जि. सांगली ४१५ ४०४, ९८२३१८१५६९
३) सुहास परांजपे, सोपेकॉम, पुणे, ९९८७०७०७९२
४) कॉ. कृष्णा खोपकर, अखिल भारतीय किसान सभा, जनशक्ती, पी.बी. रोड, वरळी, मुंबई ४०००१३, ०२२-२४९५७५७६, ९३२१५६६२२३,
५) के. जे. जॉय, सोपेकॉम, पुणे, ९४२२५०५४७३, २५८८०७८६
६) अशोक पाटील किणीकर, महाराष्ट्र राज्य इरिगेशन फेडरेशन, १३, फ्रेंडस कॉलनी, संगम थिएटर जवळ, कोल्हापूर, ०२३१-२५३७२२३, ९०११०१२७४३
७) सुहासताई कोल्हेकर, जन आंदोलनाचा राष्ट्रीय समन्वय, विजयंन अपा. ८६/४, गणंजय सोसायटी, कोथरूड, पुणे, द्वारा - आंदोलन मासिक, २५३८२७८२, ९४२२९८६७७१
८) भाई एस. एम. पाटील, शेतकरी कामगार पक्ष, डी. सी. सी. बँक, सोलापूर, ९४२२६०८३४७
९) दत्ता देसाई, समाज विज्ञान अकादमी, नारायण पेठ, पुणे, ९४२२०५७७६
१०) अजित अभ्यंकर, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, ५९४, नारायण पेठ, पुणे, २४२२०१८८, ९४२२३०३८२८
११) भरत कावळे, समाज परिवर्तन केन्द्र, ओझर, जि. नासिक, ०२५५०/ २७५२३४, ९४२३०७९४४६,
१२) संपत काळे, एन. सी. ए. एस., पुणे, २२९५२००३/४, ९४२३२०२२०२
१३) रमेश श्रीपाद सरदेसाई, ग्राहक पंचायत पिंपरी -चिंचवड, रमा निवास प्लॉट नं. ३३९, सेक्टर २७, प्राधिकरण, निगडी, पुणे ४११०४४, २७६५०९५३, ९४०३३५८४००
१४) आनंदराव पाटील, समन्यायी पाणी हक्क परिषद, ई-१०१, वुडलँड, गांधीभवन रस्ता, कोथरूड, पुणे, २५३८६३०२, ९८२२०५३६७७
१५) सुरेखा दळवी, श्रमिक क्रांती संघटना, देवनागरी सोसायटी, मु.पो. ता. पेण, जि. रायगड, ९८२११४०१०४
१६) भालचंद्र केरकर, महाराष्ट्र राज्य कष्टकरी शेतकरी संघ, २९, जीवन छाया कॉलनी, पौड रोड, पुणे ४११ ०३८, २५४४२५०१, ९४२२९८७२०५
१७) राजेंद्र भिमाजी बावके, महाराष्ट्र राज्य कष्टकरी शेतकरी संघ, मु.पो. साकुर्डी, ता. राहता, जि. अहमदनगर
१८) आनंदराव वायकर, ÷श्रमिक' टिळकरोड, अहमदनगर ४१४००१, ०२४१-२४७०१२९ ९४२३७५५५३७
१९) हिमांशु कुलकर्णी, ॲक्काडॅम, ४, लेण्याद्री सोसायटी, सुस रोड, पाषाण, पुणे - ४११ ०२१ ०२०-२५८७१५३९, ९८२२५२९२०८
२०) कचरू शंकर पुंड, भैरवनाथ पाणी वापर संस्था, वडाळा बहिरोबा, ता. नेवासा, ९८९०५८०७२६
२१) एकनाथ भागुजी धानपुणे, गहिनीनाथ पाणी वापर संस्था, माती चिंचोरा, ता. नेवासा, जि. अहमदनगर, ९८५०९६९६१५
२२) शंकरराव पंढरीनाथ कदम, त्रिमूर्ती पाणी वापर संस्था, माती चिंचोरा, ता. नेवासा, जि. अहमदनगर, ९८२४४३०८५४
२३) प्रकाश पांडुरंग नाराते, गहिनीनाथ पाणी वापर संस्था, माती चिंचोरा, ता. नेवासा, जि. अहमदनगर, ९८९०७७१५३२
२४) ॲड बाळासाहेब बागवान, पाणी पंचायत, मु.पो. लोंणद, ता. खंडाळा, जि-सातारा, ०२१६९-२२५११०, ९४२२४०२३१०



२५) विनायक गारडे, अफार्म, २/२३, रायसोनी पार्क, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे, ९७६४००५४८३
२६) झुबंरराव किसनराव गायकवाड, अजिंक्यतारा पाणी वापर संस्था, मु.पो. चिंभळे, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर, ९२२५९२११६८
२७) दादाराव देशमुख, मोर्णा प्रसुद पाणी वापर संस्थांचा संघ, मु.पो. चरणगांव, ता. पातुर, जि. गडोदा, ०७२५४- २४८०५२, ९८२१४९३४०२
२८) राजेंद्र शिवाजी गायकवाड, राजहंस सहकारी पाणी वापर संस्था, मु.पो. चिभंळे, ता.श्रीगोंदा, जि. अहमदनगर ९७६६९०४८७८
२९) संपतराव कचरू गायकवाड, माऊली पाणी वापर संस्था, मु.पो. चिकण, ता.श्रीगोंदा, जि. अहमदनगर, ९२७२५४२३३९
३०) रमेश बाबासाो गायकवाड, चेअरमन, राजहंस सहकारी पाणी वापर संस्था, मु.पो. चिंभळे, ता.श्रीगोंदा, जि. अहमदनगर, ९८५०८७४६९६
३१) श्रीनिवास नरहर सहस्त्रबुद्धे, सिंचन क्षेत्रातील तज्ज्ञ, ७५९/२३, ÷÷आशिष'', फ्लॅट नं. ६, डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४, २५६६०९०३
३२) श्रीपाद नारायण लेले, सोपेकॉम, पुणे, २५६५५३३६, ९९६०३४८८३
३३) सीमा कुलकर्णी, सोपेकॉम, पुणे, ९४२३५८२४२३, २५४६५९३६
३४) सिताराम शेलार, युवा संस्था, मुंबई, ९८३३२५२४७२
३५) रामचंद्र केशव पाटील, सोपेकॉम, पुणे, ९८८९३०२३६६
३६) आर.जी. तांबे, सह्याद्री सह साखर कारखाना, यशवंतनगर, कराड, सातारा, ९८८११९१९५१, ०२१६४-२७११७१
३७) अर्जुन कोकाटे, शेती व ग्राम विकास संस्था, ÷विद्रोह' बंगला विंचूर रोड, येवला, जि. नाशिक ४२३ ४०१, ०२५५९-२६५६६६ ९८२२९६५६६६
३८) गोवर्धन कुलकर्णी, महात्मा फुले पाणी वापर संस्था, ओझर मीग,ता. निफाड, जि. नाशिक ४२२२०६, ०२५०-२७१७७६ ९८९०६६१९६१
३९) रामनाथ बाबळे, जय योगोश्वर पाणी वापर संस्था, ओझर, जि. नाशिक ४२२२०६, ९४२१९१६६६८
४०) प्रभाकर बांदेकर, अभिनव फार्मर क्लब, प्रभुकुंज, तावरे कॉलनी, पर्वती, पुणे ४११००९, ९४२०४२५०३८,
४१) रा. सु. पोखरकर, जिव्हाळा, ३, प्रांजल सोसायटी, शिवतीर्थ नगर, कोथरूड, पुणे ४११०३८, २५४६९२९५, ९८९०४५४८५५
४२) निलम जगदाळे, गोमुख संस्था, १०, बळवंत पार्क, आय.सी.एस. कॉलनी, भुसाळे नगर, पुणे, ९३७१०८४२१८, २४२२२४८३
४३) संजीव चांदोरकर,टी. आय. एस. एस., मुंबई, ९९२०२८००३६
४४) दीपक नागनाथ, एन. ए. पी. एम.,५४७, बुधवार पेठ, पुणे - ४११ ००२, २४४५४२३१,९८९०९६१४०
४५) भाई गंगाभिषण थावरे, शेतकरी कामगार पक्ष, गजानन नगर, माजलगाव, जि. बीड ४३१ १३१, ९४२२२४४१८२
४६) सौ. लता पंडित, जागरूक नागरीक संघटना, ८२, स. नं. २७१ प्राधिकरण निगडी, पुणे
४७) संजय विठ्ठल जाधव, पाणी पंचायत, मु.पो. लोंणद, ता. खंडाळा, जि-सातारा, ०२१६९-२२५४५३, ९४२३८६७१२१
४८) हिरालाल बन्वाकिरण चोरडिया, माऊली पाणी वापर संस्था, मु.पो. चिंभळे, ता श्रीगोंदा जि. अहमदनगर, ९९२२५८३६८२
४९) सुबोध वागळे, सचिन वारघडे, जितेश परदेशी, रविंद्र जाधव, जान्हवी थत्ते, सीमा काकडे, प्रांजळ दीक्षित, संसाधने व उपजीविका गट, प्रयास, पुणे

●●●

**संपर्क पत्ता :**
संसाधने व उपजीविका गट, प्रयास
बी–२१, बी.के. ॲव्हेन्यू , सर्व्हे ८७/१० –ए,
न्यू डी.पी. रोड, आझाद नगर, कोथरुड, पुणे–४११०३८,
फोन : (०२०) २५३८८२७३, ६५६१५५९४ फॅक्स : २५३८८२७३.
Email: reli@prayaspune.org Website: www.prayaspune.org

खासगी वितरणासाठी
मे २००९

## ठोक जल दराबाबत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणास सूचना व मागण्यांचे निवेदन

**करण्याबाबत मागण्या:**

नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ मध्ये मान्य झालेले पाण्याच्या समन्यायी व्यवस्थापनाचे तर सांगड घालण्यात यावी.

लागू करताना 'आस्थापना–खर्च' (उदा. अभियंत्यांचे पगार व व्यवस्थापकीय खर्च) व इतर खर्चाचे

महाराष्ट्रातील ठोक जलदर प्रणाली निश्चिती प्रक्रिया

राज्यातील विविध नागरी गटांचे महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाला

**सविस्तर निवेदन**

ी २००९ ला पुण्यामध्ये राज्यातील विविध नागरी गटांची बैठक पार पडली. महाराष्ट्र ज.नि.प्रा) प्रकाशित केलेले 'ठोक जलदर निश्चितीचे विनियम' या विषयावरील दृष्टीनि ६० सहभागींनी सखोल चर्चा केली. राज्यातील विविध भागातून आलेले अभ्यासक, संस्था स्थाच्या पदाधिकारींनी सदर बैठकीत संयुक्त ठराव करुन जल नियमन प्राधिकरणाला दि. प स्वरुपाचे निवेदन पाठविण्यात आले.

## पाण्याच्या दरवाढीला स्वयंसेवी संस्थांचा विरोध

म. टा. प्रतिनिधी

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या अधिनियमानुसार शेतीच्या पाणी दरात ३९ टक्के आणि घरगुती पाणी वापराच्या दरात ४९ टक्के; तर उद्योग क्षेत्रात पाच टक्क्यांनी वाढ करण्याच्या प्रस्तावास राज्यातील स्वयंसेवी संस्था आणि जनचळवळींचा संयुक्तपणे विरोध असल्याची माहिती प्रयास संस्थेचे सदस्य सुबोध वागळे यांनी मंगळवारी दिली.

**दरनिश्चितीत तारतम्य नसल्याची टीका**

शेती, उद्योग आणि घरगुती वापरासाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याचे ठोक दर व त्याबाबतची नियमावली तयार करण्याचे काम प्राधिकरणामार्फत केले जाते. प्राधिकरणाच्या उपस्थित करण्यात आले. काही मागण्याही करण्यात आल्या मात्र प्राधिकरणाने याकडे दुर्लक्ष केल्याचे वागळे यांनी पत्रकार परिषदेत नमूद केले.

यावेळी श्रमिक मुक्ती दलाचे भारत पाटणकर, सोपेकॉम संस्थेचे सुहास परांजपे, सीपीआयएम संघटनेचे जिल्हा अध्यक्ष अजित अभ्यंकर कष्टकरी शेतकरी संघाचे दत्ता देसाई, प्रयासचे सचिन वारघडे आदी उपस्थित होते.

दरांबाबतची प्रस्तावित वाढ कोणत्या आधारावर आहे ते प्राधिकरणाने स्पष्ट करावे. गळती आणि चोरीमुळे वाया जाणाऱ्या पाण्याचा बोजा या वाढीवर पडू नये तसेच शेतीसाठी लागणारे पाणी अल्प दरात प्रतिनिधींनी केल्या होत्या. मात्र, प्राधिकरणाने साफ दुर्लक्ष केल्याचे वागळे म्हणाले.

पाण्याच्या गरजा पाहून दरनिश्चिती करण्याच आली नसल्याचे पाटणकर यांनी सांगितले. दैनंदिन गरजेसाठी वापरात येणारे पाणी आणि चैनीसाठी वापरात येणाऱ्या (उदा. पोहण्यासाठी) पाण्याच्या दरांमध्ये, दर निश्चिती करताना कोणताही फरक केला गेला नसल्याचे यांनी नमूद केले. प्राधिकरणाने दर निश्चिती करण्यासाठी तयार केलेल्या दृष्टीनिबंधात त्रुटी असून त्याचा पुन्हा आढावा घेण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. प्रस्तावात योग्य ते बदल न केल्यास आंदोलनाचा इशारा सर्व संघटनांतर्फे करण्यात आला आहे.

जनतेला या प्रस्तावाची माहिती व्हावी म्हणून

जल प्राधिकरण

## पाणीदराच्या प्रस्तावाला विरोध

**अजित निंबाळकर यांचे स्पष्टीकरण : हा प्रस्ताव प्राथमिक सल्लागारांचा**

सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. १२ : जल नियामक प्राधिकरणाने समोर ठेवलेल्या पाण्याच्या घाऊक दराच्या प्रस्तावाला विविध संस्था-संघटनांचे प्रतिनिधी आणि

**नियमावलीनंतरच दराचा प्रस्ताव**

सल्लागारांचा हा मसुदा केवळ चर्चेसाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यानंतर नियमावली निश्चित करण्यात येईल आणि त्यानंतर दराचा प्रस्ताव मांडण्यात येईल, असे निंबाळकर यांनी पत्रकारांना सांगितले. ही आकडेवारी प्राधिकरण थेट मान्य करणार

मसुद्यामध्ये घटनेतील समन्यायाच्या तत्त्वाला हताळ फासला असून, पाण्याचे व्यापारीकरण होत असल्यास त्याला विरोध करण्यात येईल, असा इशारा अभ्यंकर यांनी दिला. सल्लागारांच्या मसुद्यावर प्राधिकरणाचे म्हणणे काय, हे

## जलआयोगाच्या शिफारशींना शेतकऱ्यांनी हरकत घ्यावी

**पाणीपुरवठा संस्थांचे आवाहन : आज कोल्हापुरात बैठक**

सांगली, ता. १२ : पाणी वापराचा प्राधान्यक्रम अनुक्रमे पिण्यासाठी, उद्योगासाठी आणि शेतीसाठी हवा असा प्रस्ताव जलआयोगाने सादर केला आहे. त्याविरोधात शेतकऱ्यांनी हरकती घ्याव्यात. त्याबाबत चर्चा करण्यासाठी पाटबंधारेच्या कोल्हापूर येथील 'जलभवन' कार्यालयात उद्या (ता. १३) सकाळी साडेअकरा वाजता बैठक आहे. त्याला उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा सहकारी पाणीपुरवठा संस्थांचा सहकारी संघाने केले आहे.

पत्रकात म्हटले आहे, की पिण्याच्या पाण्यानंतर शेतीसाठी पाणी हवे. अन्न, धान्य शेतीतूनच तयार होते. पाणीपट्टीवाढीचा प्रस्ताव ४० टक्क्यांचा रुपये राहणार आहे. ही दरवाढ शेतीला न परवडणारी आहे. शेती उत्पादनांना बाजारात किती भाव मिळतो, याचेही मूल्यमापन व्हावे.

शासनाने स्वतःवरील जबाबदारी झटकण्यासाठी जलआयोग नेमला आहे. प्रस्थापित आमदारांनी विधानसभेत विरोध करायला हवा होता. ते मूग गिळून गप्प बसले. ही चाल यशस्वी होऊ नये, यासाठी सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी, उपसा जलसिंचन योजनेच्या पदाधिकाऱ्यांनी पुढे यावे. ज्येष्ठ नेते व विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील, क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी, क्रांतिअग्रणी जी. डी. लाड यांच्या नेतृत्वाखाली

Approach Paper

On

**Developing Regulations for Bulk Water Pricing in the State of Maharashtra**

Submitted to

Maharashtra Water Resources Regulatory Authority

***Prepared by :***

ABPS Infrastructure Advisory Private Ltd.